सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३५ | गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

३० ऑक्टोबर

- 'डॉ. होमी जहांगीर भाभा' भारतीय भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म.
- 'बरुन डी' भारतीय इतिहासकार आणि लेखक यांचा जन्म.
- 'विक्रम गोखले' भारतीय चित्रपट अभिनेते यांचा जन्म.
- 'त्रिलोक गुर्टू' भारतीय ड्रमर आणि गीतकार यांचा जन्म.
- 'दयानंद सरस्वती' भारतीय तत्त्वज्ञ आणि विद्वान यांचे निधन.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**










# महायुतीस प्राधान्यच, अन्यथा समविचारी पक्षांना सोबत घेऊन निवडणूक लढवू

## आमदार अनिलदादा पाटील; अमळनेरला शविआ, राष्ट्रवादी काँग्रेसचा झाला भव्य मेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्थानकि स्वराज्य संस्थांची निवडणूक महायुती म्हणूनच लढण्याचा विचार आहे. त्यासंदर्भात वरिष्ठ नेते निर्णय घेतील. मात्र, जर महायुती झाली नाही, तर समविचारी पक्षांना सोबत घेऊन नगर पालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू. यामध्ये सर्वच समाजघटकांना संधी देण्याचा आमचा प्रयत्न राहील, या शब्दात आपली भूमिका माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी स्पष्ट केली. अपेक्षेप्रमाणे आमदार अनिलदादा व माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी जोरदार बॅटिंग केली. या मेळाव्याच्या माध्यमातून आमदार अनिलदादा व शविआ आणि राष्ट्रवादी काँग्रेस जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात पूर्णपणे यशस्वी झाल्याचे दिसले. अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये यावेळी प्रवेश घेतला. दीर्घकाळापासून काँग्रेस व अन्य पक्षांमध्ये असलेले काही नेते राष्ट्रवादी काँग्रेसचा फटका घालून व्यासपीठावर उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील भुमिकेसंदर्भात बुधवार, दि. २९ रोजी कलागुरु मंगल कार्यालयात शविआ व राष्ट्रवादी काँग्रेसच्या भव्य कार्यकर्ता झाला. माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, सौ. भारतीताई चौधरी, माजी नगराध्यक्ष प्रभाकर पाटील, नाना चौधरी, विनोद पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, माजी उपनगराध्यक्ष विनोद लांबोळे, शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, खा. शि. मंडळाचे माजी कार्याध्यक्ष प्रवीण पाटील, जितेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य हिंमत पाटील, सत्तार मास्टर, कादर जनाब, पंचायत समितीचे माजी सभापती भोजमल पाटील, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, डॉ. अशोक पाटील, प्रकाश वाघ, खा. शि. मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक, गिरीश पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

आमदार अनिलदादा पाटील पुढे म्हणाले, की अमळनेरमध्ये जन्माला आलेला माणूसच अमळनेरचा विकास करू शकतो. या भूमित जन्माला आलेला माणूसच शहर विकास आघाडी असे नाव देऊ शकतो. आघाडीला आम्हालाही आमचे नाव देता आले असते. मात्र, आम्ही तसे केले नाही. आम्ही या भूमीत जन्म घेतल्यामुळे या भूमीचेच नाव मोठे झाले पाहिजे. माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील यांनी पाडळसे धरणाचे रोपटे लावल्यांनतर खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. त्यांचे योगदानही विसरता येणार नाही. त्यानंतर कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी पाडळसे धरणाला गती देण्याचे काम केले. त्यानंतर आपण पाठपुरावा करून धरणाला चांगल्या स्थितीमध्ये आणले आहे. धरण पूर्णत्वाकडे नेण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. अमळनेरची संस्कृती कशी आहे, त्याला साजेसे आपले वक्तव्य हवे. सर्व निवडणुका आपल्याला जिंकायच्या असतील, तर सर्वांना एकसंघ राहावे लागेल. अमळनेर शहर आपल्याला अजून चांगले करायचे आहे. ग्रामीण भागाचाही सर्वांगीण विकास साधायचा आहे. नगर पालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत हक्काचा माणूस आपण शिलेदार म्हणून निवडून दिला तर आपली गाऱ्हाणी मांडायला अधिकार आपल्याला प्राप्त होतो. ही शिलेदारांची फळी आपल्याला निर्माण करायची आहे.

पान ३ वर



"कार्यकर्ता अनिलदादांसारखाच असावा. नेता माझ्यासारखा असावा. अनिलदादांना मी आग्रह करुन करुन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणले आहे. जिल्ह्यात सर्वात उदार जनता फक्त अमळनेर तालुक्याची आहे. त्यांचे कारण म्हणजे त्यांनी मला अपक्ष म्हणून निवडुन दिले आहे. माझ्या पत्नीला नगराध्यक्षा बनवले.

अमळनेरच्या जनतेला आता एक बाब निश्चितपणे पटली आहे, की चांगल्या कामासाठी मी नेहमीच पुढे असतो. त्यासाठीच मी आज येथे आलो आहे. उमेदवारी मिळाली नाही, म्हणून कोणी नाराज राहू नका, तरच आपला विजय निश्चित आहे.

**– कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी आमदार.**



"आमदार अनिलदादा यांच्यावर उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचा पूर्णपणे विश्वास आहे. अनिलदादा यांनी आतापर्यंत ना. अजितदादा यांचा विश्वास सार्थ करणारेच विकासकार्य समर्थपणे केले आहे. या नगरीचे नेतृत्व करणाऱ्या सौ. जयश्रीताई पाटील तसेच अनिलदादा पाटील यांच्या सांगण्यावरून मी ना. गिरीशभाऊ महाजन आणि पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्याशी चर्चा केली आहे. हे तिघे मिळून महायुतीबाबतचा निर्णय घेणार आहेत.

**–संजय पवार**
**जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, जळगाव.**



"साडेनऊ वर्षांनंतर पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. तुम्ही तुमचे कर्तव्य मनापासून पार पाडले आहे. नेत्यांसाठी तुम्ही रात्रंदिवस झटलेले आहात. प्रत्येकाने परिश्रम घेऊन आपले योगदान दिले आहे. आता या निवडणुका या आपल्या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. आता ही नेत्यांची जबाबदारी आहे, की त्यांनी कार्यकर्त्यांच्या निवडणुका चांगल्या पद्धतीने पार पाडाव्यात. पक्षाने दिलेल्या आपल्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. तन- मन- धनाने काम करावे. अनिलदादा हे कार्यकर्त्यांना जपणारे नेते आहेत. आज त्यांच्या प्रेमामुळे एवढी गर्दी जमली आहे.

**– सौ. जयश्रीताई पाटील,**
**माजी नगराध्यक्ष, अमळनेर.**



"आजचा हा कार्यकर्ता मेळावा फक्त मेळावा नाही. आमदार अनिलदादांच्या नेतृत्वाखाली या शहराचा विकासरथ पुढे नेण्याचा संकल्प आहे. अनिलदादांचे खरे वैभव म्हणजे कार्यकर्ते आहेत. आपल्याला घोड्याप्रमाणे मार्गक्रमण करायचे आहे. अनिलदादा मंत्री झाल्यापासून मतदारसंघ असेल, प्रत्येक गाव, शहर किंवा प्रत्येक प्रभाग असेल, हे बदलताना आपण पाहत आहोत. हे बदलते रूप भविष्यात अधिक सुंदर होणार आहे. याचे कारण म्हणजे विकासाचे व्हिजन अनिलदादांकडे आहे. आपण सारे जण एक दिलाने कामाला लागूयात. पालिकेवर दोन्ही दादांच्या नेतृत्वाखाली शहर विकास आघाडीचा झेंडा रोवूया.

**– भारती चौधरी,**
**माजी नगराध्यक्षा, अमळनेर.**

## फरार गुन्हेगार कुरेशीला दिल्लीत अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर पोलिसांच्या ताब्यातून फरार झालेला गुन्हेगार अमजद फकिरा कुरेशी (रा. मेहरून, जळगाव) यास जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दिल्ली येथून अटक केली आहे. या कारवाईबद्दल पोलीसांचे कौतुक होत आहे. काही दिवसांपूर्वी अमळनेर पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकरणात दोन आरोपी बेड्यांसह फरार झाले होते. या घटनेनंतर जिल्हाभरात अलर्ट जारी झाला होता. विविध भागात पोलिसांच्या पथकाने शोध मोहीम सुरू केली होती. पोलिसांची तपासाची चक्रे गतीमान होती. अमजद कुरेशी हा दिल्ली येथे लपला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. एक पोलीस पथक दिल्ली येथे रवाना झाले होते. दिल्ली येथून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यास अमळनेर पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या आरोपीचाही कसून शोध सुरू आहे. त्यासही लवकर जेरबंद करण्यात येईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी दिली.

# मोबाइल गेमिंगमुळे ग्रामीण भागात मैदानी खेळ होताहेत नामशेष!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलांमध्येही 'फ्री फायर' 'पब्जी'सारख्या गेमचे व्यसन वाढत आहेत. अभ्यास करण्याऐवजी मुले तासंतास मोबाइलवर गेम खेळण्यात वेळ वाया घालवतात. सायंकाळी मुले घराजवळील ओट्यांवर, मोकळ्या जागांवर खुशाल गेम खेळताना दिसतात. यामुळे मैदानी खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पालकांसाठी ही बाब चिंतेची ठरली आहे.

मुलांना मोबाईल गेमचे व्यसन इतके जडले आहे, की एक दिवस जरी हातात मोबाईल नसला तर ते अस्वस्थ होतात. त्यांना अभ्यासातही रुची दिसून येत नाही.

**चिंता आणि नैराश्य वाढण्याची शक्यता**

मोबाईलचा अतिवापर आणि स्क्रीन ॲडिक्शनमुळे चिंता आणि नैराश्य वाढू शकते. डोळे लाल होणे, डोके दुखणे आणि झोपेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. यासाठी मोबाईलचा अतिवापर टाळणे गरजेचे आहे. मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांवर अनेक दुष्परिणाम होतात. मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. अनेक शारीरिक व्याधीही जडण्याची शक्यता असते.

**गेम्स खेळण्यासाठी महागड्या मोबाइलला पसंती**

फ्री फायर व पब्जीसारखे गेम हे जास्त जीबीचे असल्यामुळे ते खेळताना अडथळा येऊ नये. चांगला बॅटरी बॅकअप व दमदार प्रोसेसर असलेले मोबाईल मुले वापरताना दिसतात. महागड्या मोबाइलच्या किमती २५ हजारहुन अधिक किंमतीचे आहेत. ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असते. त्यातच मुलांकडून महागड्या मोबाइलच्या मागणीमुळे पालकांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागते.



### जनजागृती मोहीम राबविण्याची गरज

मोबाईल गेमच्या व्यसनापासून दूर जाण्यासाठी पालकांनी मुलांकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मुलांना शारिरीकदृष्ट्या सुदृढ राहण्यासाठी व्यायामांचे धडे देणे गरजेचे आहे. मैदानी खेळांकडे वळविण्याची गरज निर्माण झाली आहे. सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. मुलांना अभ्यासाची गोडी लावण्यासाठी पुस्तकांचे महत्व पटवून देण्याचीही गरज निर्माण झाली आहे.

## अमळनेरला उद्या 'वॉक फॉर युनिटी'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त पोलिस ठाण्यातर्फे शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी सातला महाराणा प्रताप चौकात 'वॉक फॉर युनिटी' कार्यक्रम होणार आहे. सामाजिक एकोपा, सलोखा व बंधूता हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमास अमळनेर शहर, तालुक्यातील नागरिक, राजकीय व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी, शाळा, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार बांधव व तरुणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी केले आहे.

## स्वागत सायकलस्वाराचे...!



*बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सहकार विद्यामंदिरातील पाचवीतील विद्यार्थी व सायकलस्वार तनिष्क माधव देशमुख याने बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी श्री मंगळग्रह मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर यांनी त्याचे स्वागत केले. तनिष्कने यापूर्वी महाराष्ट्रातील कळसूबाई शिखर, उत्तराखंडमधील केदार कंठा शिखर सर केले आहे. मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी त्याने बुलडाणा ते सरदार वल्लभभाई पटेल स्टॅच्यू ऑफ युनिटीपर्यंच्या ६३० किलोमीटर अंतराच्या सायकलिंग मोहिमेस प्रारंभ केला. तो ३१ ऑक्टोबर अर्थात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनी तेथे पोहोचणार आहे. त्याच्यासोबत त्याचे आई-वडीलही आहेत. यासाठी त्यास बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षांसह सर्व संचालकांचे मार्गदर्शन लाभले आहे. सायकलिंग मोहिमेसंदर्भात तनिष्क याने सांगितले, की ऑपरेशन सिंदूरनिमित्ताने ही मोहीम राबवत आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २६ नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करणे, महिला सक्षमीकरण, लवचिकता, तंदुरुस्ती आणि शिस्त यांना प्रोत्साहन देणे असून, ही मोहीम मी भारतीय सेनेला समर्पित करीत आहे.* (छायाचित्र : नितेश बारी)



# खसखस म्हणजे नेमके काय ? खसखस कुठून मिळते ?

अफूच्या बोंडातील बी म्हणजे आपण वापरतो ती खसखस. कित्येक जणांना ही गोष्ट माहीत नसेल. दिवाळीतील अनारसे बनविताना त्यावर खसखस वापरली जाते. तसेच बाळंतिणीला खसखसची लापशी खाऊ घालतात, इथपर्यंतच खसखस आणि आपली ओळख. खसखस कशी मिळवतात ? त्याआधी बघूया अफूबद्दल थोडी माहिती.

अफूच्या कच्च्या फळांना चिरा पाडून त्यावर फळातून रस पाझरतो. वाळून घट्ट झालेला रस म्हणजे अफू. मादक पदार्थ म्हणून अफूची लागवड प्राचीन काळापासून होत आली आहे. भारतामध्ये अफूच्या झाडाच्या लागवडीवर, उत्पादनावर, औषधी घटकांच्या निर्मितीवर कायद्याचे नियंत्रण आहे. अफूचे शुद्धीकरण, प्रत, विक्री, निर्यात, अल्कलॉइडांची निर्मिती इत्यादी सर्व बाबी सर्वस्वी भारत सरकारच्या आधिपत्याखाली होतात. भारत हा जगातील एकमेव मान्यताप्राप्त अफू निर्माण करणारा देश आहे.

'पॅपॅव्हर सॉम्निफेरम' असे शास्त्रीय नाव असलेल्या अफूच्या बिया म्हणजे खसखस. भारतीय खसखस ही प्रामुख्याने पांढरी असते तर युरोपियन खसखस ही निळी किंवा काळी असते. इंग्रजीत 'पॉपी सीड्स', हिंदीत 'खसखस', कन्नडमध्ये 'घस-घस' तर बंगालीत 'पोस्तो' असे म्हटले जाते. खसखशीचे कवच खूप कठीण असते. त्यामुळे ती दुधात किंवा पाण्यात काही तास भिजवून नंतर वाटली जाते. त्यानंतर कढईत कोरडी भाजून तिची पूड केली जाते. पाण्याबरोबर पेस्ट केली जाते. खसखशीत काही प्रमाणात 'ई' जीवनसत्त्व, कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, आयोडिन, मँगनीज, मॅग्नेशिअम, तांबे, पोटॅशिअम आणि जस्त यांचे प्रमाण असते.

**खसखसचे औषधी गुणधर्म आणि फायदे :**

- खसखशीच्या आवरणातील उपलब्ध तंतूमुळे पोट साफ होण्यास मदत होते तसेच हा तंतू कोलेस्टेरॉलमुळे निर्माण होणारी रसायनांमध्ये बंध निर्माण करतो. त्यामुळे विघातक कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते. परिणामी हृदयरोगाचा धोका कमी होतो.
- **खसखस वाटून अंगाला लावल्यास त्वचा मृदू होते.**
- दोन चमचे खसखस रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी खाल्ल्याने बुद्धी तल्लख होते.
- हाडांच्या मजबुतीसाठी आणि योग्य वाढीसाठी खसखस खाणे फायदेशीर ठरते.
- खसखसच्या नियमित सेवनाने आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
- निद्रानाशावरही खसखशीचा काढा घेतल्यास उपयुक्त ठरतो.
- खूप जुलाब होत असल्यास खसखशीच्या बिया वाटून त्याची लापशी किंचित जायफळ व सुंठ चूर्ण मिसळून घ्यावी.
- खूप कृश झालेल्या व्यक्तीने हिवाळ्यात खसखस लापशी जरूर घ्यावी. प्रकृती सुधारते,
- झोप येत नसल्यास साखर किंवा मधाबरोबर खसखशीचा काढा झोपताना घ्यावा.
- हाय ब्लडप्रेशर आणि रक्ताल्पता दुधातून खसखस घेतल्याने दूर होते.
- श्वसनासंबंधी विकारांवर दुधातून खसखस घेतल्यास त्वरित आराम पडतो.

**(टीप : ही सर्वसाधारण माहिती आहे. कृपया डॉक्टरांच्या सल्ल्यानेच खसखसचा वापर करावा.)**

# मंगळावरील जीवन : मानवी जिज्ञासेला नवे पंख!

मंगळाच्या लाल धुळीच्या पृष्ठभागावर 'पर्सिव्हरन्स' रोव्हरने गोळा केलेले मौल्यवान नमुने साक्ष देत आहेत.

**नासाने २०२१ मध्ये पाठविलेल्या या रोव्हरचे प्रमुख उद्दिष्ट आहे :** मंगळावर जीवनाचे चिन्ह शोधणे. हे नमुने एक दिवस पृथ्वीवर परत येतील आणि कदाचित मानवजातीच्या सर्वात जुन्या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

**आपण विश्वात एकटे आहोत का?**

यंदा सप्टेंबरमध्ये नासाने महत्त्वपूर्ण घोषणा केली : पर्सिव्हरन्सला मंगळावरील एका खडकात 'संभाव्य जैवस्वाक्षरी' (potential biosignature) सापडली. ही स्वाक्षरी जीवनाचा ठोस पुरावा नाही. ती उत्सुकतेला नवे पंख देणारी आहे. आज मंगळ कोरडा आणि थंड ग्रह वाटतो. परंतु अब्जावधी वर्षांपूर्वी त्याच्यावर दाट वातावरण आणि पाण्याचे साठे होते. जीवनासाठी अनुकूल परिस्थिती. त्यामुळे पर्सिव्हरन्स गेली चार वर्षे 'जेझेरो क्रेटर' या प्राचीन सरोवराच्या खळगीत शोध घेत आहे.

गेल्या वर्षी या खळगीत रोव्हरने ३.५ अब्ज वर्षे जुन्या खडकांचे रासायनिक विश्लेषण केले. त्यापैकी 'सॅफायर कॅनियन' नावाचा नमुना विशेष ठरला. जो 'चयावा फॉल्स' येथे सापडला. या खडकात माती व गाळाचे थर आणि चित्त्याच्या ठिपक्यांसारखी रचना आढळली. जी सूक्ष्मजीवांशी संबंधित रासायनिक क्रियांमुळे तयार झाली असावी, असा वैज्ञानिकांचा अंदाज आहे. या शोधाने उत्साह वाढला आहे. मात्र याची खात्री पृथ्वीवर नमुने आणल्यानंतरच होईल.

मंगळावरील नमुने पृथ्वीवर आणणे हे खर्चिक आणि आव्हानात्मक कार्य आहे. नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सी यासाठी 'मार्स सॅम्पल रिटर्न मिशन' राबवत आहेत. परंतु त्याचा कालावधी निश्चित नाही. दरम्यान, चीनने २०२८ मध्ये स्वतःची मोहीम राबवण्याची घोषणा केली आहे. मंगळावर जीवन होते का, हा प्रश्न केवळ वैज्ञानिक कुतूहलापुरता नाही.

मंगळ हे मानवजातीच्या भविष्याचे प्रतीक आहे. पृथ्वीवर हवामानबदल आणि संसाधनांचा तुटवडा वाढत असताना, मंगळ आपल्या विस्ताराच्या स्वप्नांचे कॅनव्हास बनले आहे. अंतराळ संशोधन आता जागतिक सहकार्यापेक्षा स्पर्धेचे क्षेत्र बनले आहे. मंगळाचे नमुने कोण आधी आणणार? पहिले पाऊल कोण ठेवणार? या प्रश्नांत राष्ट्र आणि कंपन्या स्पर्धेत उतरल्या आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मंगळावरील प्रत्येक शोध आपली जिज्ञासा वाढवतो. हे खडक फक्त मंगळाविषयी नाहीत, तर ते मानवी शोधयात्रेचा पुरावा आहेत. मंगळावरील जीवनाचे ठसे सापडोत वा न सापडोत, हा शोध आपल्याला नवे प्रश्न विचारायला लावतो आणि मानवजातीच्या स्वप्नांना नवे पंख देतो!



# भारतात किती लोक रोज उपाशी झोपतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जागतिक अन्न दिनाच्या (१६ ऑक्टोबर) निमित्ताने पुन्हा एकदा भारतातील उपासमारीची गंभीरता समोर आली आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२५ नुसार भारत १२३ देशांमध्ये १०२ व्या स्थानावर आहे. त्याचा स्कोअर २५.८ आहे. जो 'गंभीर' श्रेणीत मोडतो. दररोज १९ कोटींपेक्षा जास्त लोक उपाशी झोपतात. ही संख्या अनेक देशांच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. दुसरीकडे दरवर्षी ७८.२ दशलक्ष टन अन्न वाया जाते. ज्याची आर्थिक किंमत सुमारे ९२ हजार कोटी रुपये आहे. ही शोकांतिका असली, तरी शासकीय योजना आणि सामाजिक प्रयत्नांमुळे सुधारणा होत आहे.

**जागतिक अन्न दिन २०२५ :** 'हँड इन हँड फॉर बेटर फूड अँड बेटर फ्युचर' दरवर्षी १६ ऑक्टोबरला साजरा होणारा जागतिक अन्न दिन संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संस्थाने 1945 मध्ये सुरू केला होता. यंदा अन्न आणि कृषी संस्थेला ८० वर्षे पूर्ण होत असल्याने हा दिवस विशेष आहे. २०२५ ची थीम 'हँड इन हँड फॉर बेटर फूड अँड बेटर फ्युचर' आहे, जी शाश्वत अन्न व्यवस्था आणि भूकमुक्त जगासाठी सामूहिक प्रयत्नांना प्रोत्साहन देते. हा दिवस उपासमार, कुपोषण आणि अन्न वाया जाण्याच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधतो. अन्न आणि कृषी संस्थेच्या मते जगात दरवर्षी १.०५ दशलक्ष टन अन्न वाया जाते. ज्यामुळे ८-१० टक्के ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन होते.

**भारतातील उपासमारीचे भयावह चित्र**

ग्लोबल हंगर इंडेक्स २०२५ नुसार भारतात १३.७ टक्के लोक कुपोषित आहेत. ३५.५ टक्के लहान मुले स्टंटेड (उंची कमी) आहेत. १८.७ टक्के वेस्टेड (वजन कमी) आहेत आणि २.९ टक्के मुले पाच वर्षांपूर्वीच मृत्यू पावतात. ही संख्या चीनपेक्षा जास्त आहे. जगातील एकूण उपाशांपैकी एक चतुर्थांश भारतात आहेत. २०१९-२०२१ दरम्यान ३०७ दशलक्ष लोकांना गंभीर अन्न असुरक्षितता भेडसावली. तर २२४ दशलक्ष लोक क्रॉनिक भुकेले आहेत. दक्षिण आशियातील शेजारी देश जसे बांगलादेश (६८ वे), श्रीलंका (५६ वे) आणि नेपाळ (८४ वे) यांच्यापेक्षा भारताची स्थिती गंभीर आहे.



**उपासमारीमागील मुख्य कारणे**

**१) अन्न वाया जाणे :** भारतात दरवर्षी ७८.२ दशलक्ष टन अन्न वाया जाते. ज्यात ६३ टक्के घरांमधून, २३ टक्के रेस्टॉरंट्समधून आणि १३ टक्के रिटेल दुकानांमधून वाया जाते. जगभरात २५०० दशलक्ष टन अन्न वाया जाते. ज्यामुळे अन्न असुरक्षितता वाढते.

**२) आर्थिक विषमता :** भारतातील आर्थिक असमतोलतेमुळे गरिबांना रात्रीचे जेवणही मिळत नाही. शहरी स्लम्समध्ये ५१ टक्के कुटुंबांना अन्न असुरक्षितता भेडसावते.

**३) अन्न वाटपातील त्रुटी :** साठवणूक व्यवस्थेतील कमतरता आणि वितरणातील असमानतेमुळे योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही.

**४) लिंगभेद आणि कुपोषण :** महिलांमध्ये आणि लहान मुलांमध्ये कुपोषण अधिक आहे. ज्यामुळे आरोग्य समस्या वाढतात.

**शासकीय प्रयत्न आणि पुढील मार्ग**

भारत सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३, मिड-डे मील योजना, अंगणवाडी कार्यक्रम आणि सार्वजनिक वितरण प्रणाली यांसारख्या योजनांद्वारे उपासमार कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत. यामुळे २००० पासून बाल मृत्यूदर कमी झाला आहे. कुपोषण अजूनही आव्हान आहे. जीएचआयनुसार २०१६ पासून प्रगती थांबली असून, २०२३० पर्यंत 'झीरो हंगर' लक्ष्य कठीण आहे.

**अन्न दान आणि पुनर्वितरण :** अतिरिक्त अन्न गरजूंपर्यंत पोहोचविणे.

**साठवणूक सुधारणा :** कोल्ड स्टोरेज आणि सप्लाय चेन मजबूत करणे.

जागरूकता : अन्न वाया टाळण्यासाठी अभियान राबविणे.

**धोरणात्मक बदल :** शाश्वत शेती आणि लिंग समानता वाढविणे.

पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असतानाही १९ कोटी लोक उपाशी असणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. जागतिक अन्न दिनाच्या थीमप्रमाणे 'हँड इन हँड' प्रयत्नांनी भूकमुक्त भारत शक्य आहे. नागरिक, सरकार आणि संस्थांनी एकत्र येऊन अन्न वाया घालविणे आणि वाटप सुधारणे आवश्यक आहे.

# सयाजी शिंदे यांची प्रेमकहाणी : हॉस्पिटलमधील भेट ते लग्न; पत्नी अलकाने सांगितला खास किस्सा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत दमदार अभिनयाने सर्वांना प्रभावित करणारे सयाजी शिंदे हे मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. आपल्यातील अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. त्यांची खासगी आयुष्यातील प्रेमकहाणीही तितकीच रंजक आहे. सयाजी शिंदे यांच्या पत्नी अलका शिंदे यांनी नुकतीच एका मुलाखतीत त्यांच्या पहिल्या भेटीचा आणि लग्नापर्यंतच्या प्रवासाचा खुलासा केला. अलका या स्वतः सयाजी यांच्या मोठ्या चाहत्या होत्या आणि आजही त्यांच्या चित्रपटांबद्दल त्या अभिप्राय देतात.

**हॉस्पिटलमधील पहिली भेट**

अलका शिंदे यांनी सांगितले, की त्यांची आणि सयाजी यांची पहिली भेट एका हॉस्पिटलमध्ये झाली. तेव्हा माझ्या बहिणीचे पती हॉस्पिटलमध्ये दाखल होते. मी त्यांना भेटायला गेली होती. तेथे मला कळले, की सयाजी शिंदे तेथेच उपचार घेत आहेत. मी त्यांची मोठी चाहती होते. मी त्यांचे 'शोभायात्रा' नाटकही पाहिले होते. मी थेट त्यांना भेटायला गेली आणि त्यांच्याकडून ऑटोग्राफ घेतला. सयाजी यांना तेव्हा कावीळ झाला होता. त्यांनी मला विचारले, तू काय वाचतेस? मी सांगितले, की मी एम.ए. करत आहे आणि अमुक पुस्तके वाचते. तेव्हा त्यांनी मला विचारले, की तू मला पुस्तके वाचायला देशील का ? मला खूप आनंद झाला, की एवढा मोठा माणूस माझ्याकडे काहीतरी मागत आहे. दुसऱ्या दिवशी मी त्यांना पुस्तक दिले.

**मैत्री ते लग्न**

पुस्तक दिल्यानंतर त्या ही भेट विसरल्या. पण दोन-तीन महिन्यांनी सयाजी यांचा फोन आला, की तू दिलेले पुस्तक परत हवे आहे का? यानिमित्ताने त्यांची पुन्हा भेट झाली आणि मैत्री वाढली. दोन-तीन वर्षे एकमेकांना समजून घेतल्यानंतर त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. लग्नाच्या निर्णयाबाबत अलका म्हणाल्या, की अभिनय क्षेत्र अस्थिर मानले जाते. त्यामुळे माझ्या घरच्यांना थोडी चिंता होती. माझे वडील त्या काळात वारले होते. त्यामुळे मोठा भाऊ होता. त्याला फक्त आमच्यातील १५ वर्षांचे वयाचे अंतर खटकत होते. त्याने विचारले, की तू कसे जुळवून घेशील? पण सयाजी यांनी सर्वांना आपलेसे केले आणि आमच्या तयारीमुळे घरच्यांनी संमती दिली.

**सयाजी यांच्याबद्दल अलकांचे मत**

अलका यांनी सयाजी यांचे कौतुक करताना सांगितले, की त्यांचा स्वभाव इतका आपुलकीचा आहे की ते प्रत्येकाला सहज आपलेसे करतात.



सक्सेस स्टोरी

# यूपीएससी के लिए इंजीनियरिंग छोड़ी, आयएफएस बनीं गीतिका टम्टा : सोशल मीडिया त्यागकर पूरा किया अफसर बनने का सपना

'सोशल मीडिया की चकाचौंध में फंसे लाखों युवाओं के बीच गीतिका टम्टा ने एक अनोखा फैसला लिया। सब कुछ छोड़कर यूपीएससी पर फोकस किया।' नैनीताल की रहने वाली गीतिका ने इंजीनियरिंग की डिग्री होने के बावजूद सिविल सेवा का रास्ता चुना। २०२१ में न्यू ईयर रेजोल्यूशन से शुरू हुई उनकी यात्रा ने २०२२ में फल दिया, जब उन्होंने यूपीएससी सीएसई में २३९ वीं रैंक हासिल की और भारतीय विदेश सेवा (आयएफएस) अधिकारी बनीं। उनकी यह प्रेरक कहानी उन सभी एस्पिरेंट्स के लिए सबक है, जो संघर्ष से जूझ रहे हैं। आइए जानते हैं गीतिका की सफलता की पूरी कहानी।

**साधारण पृष्ठभूमि से शुरू हुआ यूपीएससी का सफर**

गीतिका टम्टा उत्तराखंड के ओइथोरागढ़ जिले की रहने वाली हैं। उन्होंने नैनीताल से स्कूली शिक्षा पूरी की और हरियाणा के एक कॉलेज से इंजीनियरिंग की डिग्री हासिल की। इंजीनियरिंग के बाद नौकरी के बजाय उन्होंने यूपीएससी की तैयारी चुनी, जो उनके परिवार के लिए भी एक बड़ा फैसला था। गीतिका कहती हैं, "मेरा सपना था देश की सेवा करना, इसलिए इंजीनियरिंग छोड़ दी।" दिल्ली शिफ्ट होने के बाद उन्होंने तैयारी शुरू की, लेकिन कोविड-१९ की दूसरी लहर ने सबकुछ उलट-पुलट कर दिया। मई २०२१ में प्रीलिम्स स्थगित होने पर वे नैनीताल लौट आईं, जहां उन्होंने अपनी मां की जैकेट पहनकर परीक्षा दीजिसे उन्होंने अपना 'लकी चार्म' माना।

**न्यू ईयर रेजोल्यूशनः सोशल मीडिया को कहा अलविदा**

मुक्तेश्वर में २०२१ के न्यू ईयर सेलिब्रेशन के दौरान गीतिका ने संकल्प लिया कि इस साल यूपीएससी क्रैक करेंगी। शुरुआत अच्छी रही, लेकिन जल्द ही सोशल मीडिया (खासकर इंस्टाग्राम) ने उनका ध्यान भटकाना शुरू कर दिया। महसूस होते ही उन्होंने साहसिक कदम उठाया १५ जनवरी २०२१ को सभी सोशल मीडिया अकाउंट्स डिलीट कर दिए। गीतिका बताती हैं, "सोशल मीडिया समय चुरा रहा था, जो मेरी पढ़ाई के लिए था। इसे छोड़ना मेरी सबसे बड़ी जीत थी।" इस फैसले ने उन्हें न केवल फोकस दिया, बल्कि प्रेरणा भीआज वे सफल होने के बाद सोशल मीडिया पर वापस आ चुकी हैं, जहां उनके ९४,००० से ज्यादा फॉलोअर्स हैं।



**परिवारिक कार्यक्रमों से भी बनाई दूरी, बढ़ाया पढ़ाई का समय**

सोशल मीडिया के अलावा परिवारिक और सामाजिक कार्यक्रम भी बाधा बन रहे थे। गीतिका ने त्योहारों और रिश्तेदारों के आयोजनों से दूरी बना ली, ताकि पढ़ाई पर पूरा ध्यान रहे। उन्होंने दैनिक अध्ययन घंटे बढ़ाए और समय प्रबंधन के सख्त नियम अपनाए। दिल्ली की सर्दी में स्वास्थ्य समस्याओं का सामना करते हुए भी उन्होंने हार नहीं मानी। वर्कआउट और एरोमाथेरेपी से मेंटल हेल्थ का ख्याल रखा। जनवरी २०२२ में परिवार देहरादून शिफ्ट हो गया, तो गीतिका अकेले दिल्ली में मेन्स की तैयारी करने लगीं।

**परीक्षा की चुनौतियां : प्रीलिम्स से इंटरव्यू तक की जंग**

**प्रीलिम्स (अक्टूबर २०२१) :** नैनीताल से ही परीक्षा दी और सफलता हासिल की। फिर तुरंत मेन्स की तैयारी में जुट गईं।

मेन्स : परिवारिक तनाव के बावजूद फोकस बनाए रखा। परीक्षा के बाद देहरादून लौटीं।

इंटरव्यू : दिल्ली में कई मॉक इंटरव्यू दिए, जो अंतिम दौर की तैयारी साबित हुए।

३० मई २०२२ को यूपीएससी के रिजल्ट आने पर गीतिका की मेहनत रंग लाई। उन्हें २३९ वीं अखिल भारतीय रैंक मिली। सफलता का जश्न मनाने वे परिवार के साथ हरिद्वार गईं। आयएफएस अधिकारी बनने के बाद गीतिका ने २०२४ के G२० समिट में भारत का प्रतिनिधित्व किया, जो उनकी उपलब्धि का नया अध्याय है।

गीतिका की कहानी साबित करती है कि असली सफलता संघर्ष को किनारे कर दृढ़ संकल्प से आती है। अगर आप भी यूपीएससी की तैयारी कर रहे हैं, तो गीतिका से सीखें : 'फोकस रखो, त्याग करो, और सपना पूरा करो।'

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून...

## अमळनेरला शविआ, राष्ट्रवादी काँग्रेसचा झाला भव्य मेळावा

आपल्यातील मतभेद बाजूला सारुन कामाला लागा. जाती-पातीला थारा न देता आपल्या उमेदवाराच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहा. नगराध्यक्षपदासाठी आपल्याकडे बारा उमेदवारांची नावे आली आहेत. सर्व उमेदवार हे सोन्यासारखे आहेत. प्रत्येकाला राजकीय, सामाजिक प्रतिष्ठा आहे. नवीन पिढीतील काहींनीही आपल्याकडून अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे उमेदवाराची निवड करताना तारेवरची कसरत होणार आहे. मात्र, निर्णय घेताना जर महायुती म्हणून निवड करण्याची वेळ आली, तर कोणी नाराज होऊ नये. जो प्रामाणिकपणे काम करेल त्याच्या पाठीशी आपल्याला उभे राहायचे आहे. आपल्यावर अन्याय झाला आहे, असे न वाटू देता सर्वांनी नाराज न होता जोमाने प्रचाराला लागून आपले उमेदवार निवडून द्यावेत. नाराजांनाही भविष्यात नक्कीच संधी दिली जाईल. लोकसभा, विधानसभेत जसे आपण प्रयत्न केले, तसेच प्रयत्न येणाऱ्या निवडणुकांमध्येही आपल्याला करायचे आहेत. उमेदवार निवड प्रक्रियेसाठी विशेष समिती (कोअर कमिटी) गठीत केली जाईल. जनतेच्या मनातील आणि लोकाभिमुख उमेदवारालाच उमेदवारी दिली जाईल. खासदार स्मिताताई वाघ तसेच शिवसेना व महायुतीच्या नेत्यांशीही सकारात्मक चर्चा झाली आहे. यापुढे आपण कदाचित महायुतीचा मेळावा घेऊ. अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात आहे. निवेदन व आंदोलन करून निधी मिळत नाही. पीडित शेतकरी बांधवाना मदत द्या, अशी विनंती मी स्वतः उपमुख्यमंत्री व कृषी मंत्री व मदत पुनर्वसन मंत्र्याकडे केली आहे. येणाऱ्या कॅबिनेटमध्ये दिवाळीनंतर झालेल्या अतिवृष्टीबाबत मदतीचा निर्णय व्हावा अशी विनंतीही केली आहे. या वेळी माझे विशेष लक्ष नंदुरबारकडे राहणार आहे. दरम्यान, विरोधकांनी अनिलदादांवर केलेल्या टिकेचाही त्यांनी चांगलाच समाचार घेतला. यावेळी माजी जि. प. सदस्य हिंमत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष इम्रान खाटीक यांनीही मनोगत व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष विनोद कदम सर यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी आभार मानले.

# एक नोव्हेंबरपासून बँकेचे नवे नियम लागू होणार

## आधार कार्ड अपडेट ते बँक नॉमिनीचा पर्याय नागरिकांना मिळणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशभरात १ नोव्हेंबर २०२५ पासून बँकेचे अनेक महत्त्वाचे नियम बदलणार आहेत. ज्यांचा थेट परिणाम नागरिकांच्या खिशावर आणि दैनंदिन जीवनावर होईल. आधार कार्डपासून बँकिंग, गॅस सिलिंडर आणि म्युच्युअल फंडापर्यंत सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये महिन्याच्या पहिल्या तारखेपासूनच बदल लागू होतील. ज्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. १ नोव्हेंबरपासून कोणते ५ मोठे बदल प्रत्येक नागरिकावर थेट परिणाम करतीत? ते जाणून घेऊया.

### एकाच बँक खात्यावर ४ नॉमिनी

१ नोव्हेंबरपासून ग्राहक बँक खाते, लॉकर्स आणि जमा ठेवींसाठी जास्तीत जास्त चार जणांना नॉमिनी (वारसदार) करू शकतील. हा बदल बँकिंग कायदा (सुधारणा) २०२५ अंतर्गत लागू केला जाईल.

### एसबीआय क्रेडिट कार्डवर नवीन शुल्क

तुम्ही एसबीआयचे क्रेडिट कार्ड वापरत असाल, तर या बदलाचा थेट परिणाम तुमच्यावर होईल. असुरक्षित क्रेडिट कार्डवर आता ३.७५ टक्के शुल्क लागू





आहे. शिवाय तुम्ही क्रेड, चेक, मोबिकविक इत्यादी थर्ड पार्टी ॲप्सद्वारे शाळा किंवा महाविद्यालयीन शुल्क भरल्यास तुम्हाला अतिरिक्त १ टक्का शुल्क आकारले जाईल.

### आधार कार्ड अपडेट

'यूआयडीएआय'ने १ नोव्हेंबरपासून तुमचे आधार कार्ड अपडेट करण्याच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. आता तुम्ही आधार केंद्राला भेट न देता तुमचे नाव, पत्ता, जन्मतारीख आणि मोबाईल नंबर ऑनलाईन अपडेट करू शकता. मात्र तुम्हा फक्त फिंगरप्रिंट किंवा आयरिस स्कॅनसारख्या बायोमेट्रिक माहितीसाठी आधार केंद्राला भेट द्यावी लागेल. 'यूआयडीएआय' पॅन, पासपोर्ट, रेशन कार्ड, मनरेगा आणि शाळेच्या नोंदी यासारख्या सरकारी डेटाबेसमध्ये तुमची माहिती आपोआप पडताळेल.

### म्युच्युअल फंडसाठी सेबीचे नवे नियम

१ नोव्हेंबरपासून म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांनाही नवीन नियम लागू होतील. म्युच्युअल फंडामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी सेबीने कडक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ज्यानुसार आता एएमसीचे अधिकारी, कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक १५ लाखांपेक्षा जास्त व्यवहार करत असतील, तर कंपनीला ही माहिती अनुपालन अधिकाऱ्यांना कळवावी लागेल.

### गॅस सिलिंडरचे दर सुधारित होणार

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमती सुधारित केल्या जातात. गेल्या महिन्यात व्यावसायिक सिलिंडरचा दर महागला होता तर मागील काही महिन्यांपासून घरगुती गॅस सिलिंडरचा दर जशास तसा आहे. त्यामुळे आता महिन्याच्या पहिल्या तारखेला एलपीजीच्या दरात काय बदल होतो याकडे ग्राहकांचे लक्ष लागून असेल.

# उदयनगर येथे रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## शाळा विकासाचा ठराव करून जोपासली सामाजिक बांधिलकी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



समृद्ध पंचायत राज अभियानांततर्गत अमळनेर तालुक्यातील उदयनगर येथील शाळेत सोमवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी आजी- माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळा विकासासाठी निधी गोळा करून विकासाचा ठराव केला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

लोकनियुक्त सरपंच प्रकाश वाघ यांनी सांगितले, की जेथे आपण अक्षर ओळखले, शिस्त शिकलो आणि जीवनात लढत पुढे जाण्याची प्रेरणा मिळवली. या शाळेनेच आपल्याला जगण्याचे बळ दिले. अशा माऊलीच्या उपकारातून उतराई होण्याचा प्रयत्न आपण करूयात. ज्या शाळेने आपल्यावर 'ज्ञानाचे कर्ज' केले, ते किमान काही अंशी तरी परत फेडण्याची ही संधी आहे, असे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी विद्यार्थ्यांनी सुमारे १ लाख २६ हजार रुपये जमा केले. या निधीतून शाळेसाठी लोकसहभागातून रंगमंच, किचन शेडसाठी नवीन पत्रे, एलईडी टीव्ही व 'आरओ' खरेदी करण्यात येणार आहे. शाळेचे माजी विद्यार्थी तथा शिरपूर येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शांताराम सोनवणे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. माजी विद्यार्थी राजकिरण पाटील यांनीही शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

यावेळी माजी सरपंच धुडकू अभिमान पाटील, विकास सोसायटीचे चेअरमन शांताराम पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश पाटील, उपसरपंच राकेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, राजेंद्र पाटील, सुदाम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी सोनी पाटील, माजी विद्यार्थी किशोर वाघ, वासुदेव कापडणे, शांताराम सोनवणे, पोलीस पाटील श्री. खैरनार, सतीलाल पाटील, सुनील पाटील, कृष्णा पाटील, किरण पाटील, शिक्षक संजय पाटील, श्री. शिंदे, अंगणवाडी सेविका-मदतनीस, आशा वर्कर, सुभाष पाटील (रोजगार सेवक), सागर सोनवणे (ग्रामपंचायत शिपाई) तसेच माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. नितीन शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक श्री. मासुळे यांनी सूत्रसंचालन केले. संजय पाटील यांनी आभार मानले. स्नेहसंमेलनानंतर "स्वच्छतेचा वार सोमवार" या उपक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता, विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# खंडपीठाची राज्य शासनाला कारणे दाखवा नोटीस !

## राज्य महामार्ग भुसंपादन प्रकरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या वर्षी राज्य शासनाने भडगाव- वलवाडी- चोरवड- भोंडण- पारोळा- सडावण- अमळनेर- गांधली- अमळगाव-जळोद-बुधगाव- हातेड- गलवाडे- लासुर- सत्रासेन- खामखेडा- आंबे - खंबाळे- जोयदा- सांगवी- बोराडी- बुडकी- कोडीद- मालकातर- मंदाणा- असलोद-कर्जोत-डोंगरगाव- शहादा- कलसाडी- परीवर्धे- तऱ्हाडी- बोरद- मोड- आमलाड अशा एकूण २१३ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे बांधकामासाठी कंत्राट काढून कामाला सुरुवात केली. याप्रकरणी शेतकऱ्यांना कुठलीही सूचना न देता सदर रस्त्याला राज्य महामार्ग घोषित केला.

भूसंपादन मोबदला न देता, बळजोरीने जमिनीचा ताबा घेऊन काम सुरू केले. संविधानाच्या अनुच्छेद ३००अ नुसार भूसंपादन प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक आहे. काही ठिकाणी रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. काही ठिकाणी अपूर्ण आहे किंवा सुरू झालेले नाही.

वलवाडी येथील बाबाजी ओंकार पाटील आणि इतर ३० शेतकरी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. भूसंपादन प्रक्रिया राबवून बाधित जमिनीसाठी मोबदला देण्याचे आदेश व्हावेत अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या बाधित जमिनीचे गांभीर्य लक्षात घेऊन खंडपीठाने ऐन भाऊबीजच्या दिवशी तातडीची सुनावणी घेतली. राज्य शासनाला भूसंपादन प्रक्रिया का राबवण्यात आली नाही, अशी विचारणा करुन कारणे दाखवा नोटीस काढली आहे. याचिकाकर्ते शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. भुषण महाजन कामकाज पाहत आहेत.

# शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणी अत्यावश्यक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या १४ ऑक्टोबर २०२४च्या शासन निर्णयानुसार सर्व शेतकऱ्यांची एग्रीस्टॅक नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यातील अनुदानाची रक्कम लवकरच जमा होणार आहे. या पार्श्वभूमीवर ज्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण आहे, त्या शेतकऱ्यांची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होईल. मात्र, ज्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, त्या शेतकऱ्यांनी सातबारा उतारा व आधारकार्ड घेऊन सरकार सेवा केंद्रावर जाऊन नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# अमळनेर बस आगारातील चालक- वाहकांचा प्रामाणिकपणा

## कर्णबधीर मुलीचे यंत्र परत करुन घडविले माणुसकीचे दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- अकोला मार्गावर धावणाऱ्या राज्य परिवहन बसचे चालक आणि वाहक यांनी प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. मलकापूर येथील एका दांपत्याच्या कर्णबधीर मुलीचे बसमध्ये राहिलेले यंत्र (हिअरिंग एड) शोधून त्यांनी परत केले आहे. ही घटना सोमवार, दि. २६ ऑक्टोर रोजी दुपारी एकच्या सुमारास अकोला येथे घडली.

याबाबत वाहक मनोज पाटील यांनी सांगितले, की अमळनेर- अकोला बसमध्ये आम्ही कर्तव्यावर होतो. मलकापूर येथून एक गरीब दांपत्य त्यांच्या कर्णबधीर मुलीसह दवाखान्यात जाण्यासाठी बसले होते. आम्ही अकोला आगरात पोहोचल्यानंतर जेवणास निघून गेलो होतो. काही वेळानंतर हे दांपत्य आगारात यंत्राच्या शोधासाठी आले होते. त्यांनी आमच्याशी संपर्क साधून यंत्र हरविल्याची माहिती दिली. आम्ही लागलीच बसमध्ये शोधाशोध सुरू केली. बसमधील एका सीटखाली हे यंत्र पडलेले आम्हास दिसले. त्यानंतर आम्ही खातरजमा करून यंत्र त्यांना परत केले. यंत्र परत मिळाल्याने दांपत्याच्या डोळ्यात अश्रू तरळले होते. या यंत्राची किंमत तब्बल ३५ हजार रुपये होती. ही रक्कम त्या गरीब कुटुंबासाठी अत्यंत मोठी होती. दरम्यान, या दांपत्याने वाहक श्री. पाटील व चालक श्री. ढवळे यांना बक्षीस देऊ केले. मात्र, त्यांनी नम्रपणे यास नकार दिला. हे आमचे कर्तव्य व जबाबदारी आहे, अशा भावना चालक- वाहकांनी व्यक्त केल्या. चालक- वाहकांनी दाखविलेली समयसूचकता व प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रवाशांच्या वस्तू सुरक्षित ठेवण्याचा आणि परतफेड करण्याचा हा आदर्श सर्व कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणदायी ठरला आहे.





ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!







जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# कापूर कसा तयार होतो? अन् लगेच पेट का घेतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सणासुदीच्या काळात प्रत्येक घरात, मंदिरात आणि धार्मिक विधींमध्ये कापूर अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कापूरमध्ये औषधी गुणधर्म आणि हवा शुद्ध करण्याचे गुण असतात. कोरोना काळात त्याचा उपयोग घरातील बॅक्टेरिया कमी करण्यासाठी झाला. कापूरला काडी लागताच तो क्षणार्धात पेट घेतो. त्याचा सुगंध सर्वत्र पसरतो. पण कापूर नेमका कसा तयार होतो? तो इतक्या सहजपणे पेट का घेतो? यामागील वैज्ञानिक कारणे जाणून घेऊया.

### कापूरचे प्रकार

बाजारात दोन प्रकारचे कापूर उपलब्ध आहेत.

१) **नैसर्गिक कापूर :** कापूरच्या झाडापासून (वैज्ञानिक नाव : Cinnamomum camphora) तयार केले जाते.

२) **कृत्रिम कापूर :** रासायनिक प्रक्रियेद्वारे (उदा.- टर्पेंटाइन तेलापासून) तयार केले जाते.

### कापूरची निर्मिती

**नैसर्गिक कापूर :** कापूरच्या झाडापासून मिळते. हे झाड ५०-६० फूट उंच वाढते. वर्षभर हिरवेगार राहते. त्याची पाने गोलाकार आणि सुमारे ४ इंच रुंद असतात. कापूर प्रामुख्याने झाडाच्या साली, लाकडात आणि पानांतून मिळते. निर्मिती प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१) **साल आणि लाकूड गोळा करणे :** झाडाची साल आणि लाकूड काढले जाते.

२) **वाफेवर प्रक्रिया :** यांना वाफेच्या (स्टीम डिस्टिलेशन) प्रक्रियेद्वारे गरम केले जाते. ज्यामुळे कापूरचे तेल वेगळे होते.

३) **शुद्धीकरण :** हे तेल शुद्ध करून त्याचे स्फटिक (क्रिस्टल्स) बनविले जातात, जे म्हणजे कापूर.

**कृत्रिम कापूर :** टर्पेंटाइन तेलापासून रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केले जाते. जे कमी खर्चिक आहे. पण त्यात नैसर्गिक कापूरचे औषधी गुण कमी असतात.

### कापूरचे झाड कुठे आढळते?

कापूरचे झाड प्रामुख्याने पूर्व आशियात, विशेषतः चीन आणि जपानमध्ये आढळते. हे झाड त्याच्या सभोवतालच्या अर्धा किलोमीटर परिसरातील हवा शुद्ध करते. भारतात पश्चिम घाट, पूर्व हिमालय आणि अंदमान बेटांवर त्याची लागवड केली जाते. १८८२-१८८३ मध्ये लखनौच्या बागायती बागांमध्ये कापूरच्या झाडाची यशस्वी लागवड झाली होती, असे कोलकत्याच्या स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसीनच्या १९३२ च्या संशोधनात आर. एन. चोप्रा आणि बी. मुखर्जी यांनी नमूद केले.

### कापूर इतक्या सहजपणे पेट का घेतो?

कापूरमध्ये कार्बन आणि हायड्रोजन यांचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे त्याचा प्रज्वलन बिंदू (इग्निशन पॉइंट) खूप कमी म्हणजेच सुमारे ६६ सी (१५० एफ) असतो. यामुळे तो थोड्याशा उष्णतेने (उदा.- काडीच्या घर्षणाने) पेट घेतो. कापूरची वाफ हवेतून वेगाने पसरते. वातावरणातील ऑक्सिजनशी संपर्क आल्यावर ती सहज जळते. यामुळे कापूरला काडी लागताच तो क्षणार्धात पेटतो आणि सुगंध पसरवतो.

### कापूरचे फायदे

**औषधी गुण :** कापूरमध्ये बॅक्टेरियानाशक गुणधर्म असतात. जे हवा शुद्ध करण्यास आणि श्वसनाचे आजार कमी करण्यास मदत करतात.
धार्मिक उपयोग : पूजा, आरती आणि धार्मिक विधींमध्ये कापूरचा वापर शुभ मानला जातो.
**पर्यावरणीय फायदा :** कापूरचे झाड हवा शुद्ध करते. पर्यावरणाला फायदा पोहोचवते.



# श्रीक्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या क्षेत्राचा उल्लेख श्रीमद्गुरुचरित्र या ग्रंथात आढळतो. येथे श्रीपाद श्रीवल्लभ घरातून निघाल्यानंतर तीर्थक्षेत्रे फिरत असता या ठिकाणी ३ वर्षे राहिल्याचा उल्लेख आढळतो. हे अतिशय पुरातन शिव मंदिर असून, अत्यंत प्रासादिक तीर्थक्षेत्र आहे. अनेक जन्मांची पापे येथे केवळ दर्शनाने नाश पावतात, असा क्षेत्रमहात्म्यात उल्लेख आहे. या भूमीवर अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. या सर्व तीर्थक्षेत्रांत कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यात अत्यंत पवित्र व प्रेक्षणीय समुद्र किनारी गोकर्ण हे तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी 'महाबळेश्वर' नावाचे स्वयंभू शिवलिंग (आत्मलिंग) आहे. रावणाने घोर तपश्चर्या करून जे शिवाचे आत्मलिंग मिळविले त्याची श्रीगणेशजींनी या क्षेत्री स्थापना केली.

### आत्मलिंगाची उत्पत्ती कशी झाली?

कालाग्नीसारखा एक महाकाय पशू होता. त्या पशूला तीन शिंगे होती. एकदा ब्रह्मा-विष्णू-महेश शिकारीसाठी गेले होते. त्यांनी त्या पशूची शिकार केली. त्यांनी त्या पशूची तिन्ही शिंगे काढली. त्या प्रत्येक शिंगाखाली एकेक प्राणलिंग होते. ती तिन्ही लिंगे त्या तिघांनी घेतली. यातील आत्मलिंग हे शंकरांना मिळाले होते. जो या आत्मलिंगाची तीन वर्षे पूजा करील तो स्वतः ईश्वर होईल. हे आत्मलिंग ज्या स्थानी असेल ते स्थान कैलास होईल. रावणाने ते आत्मलिंग वर काढण्यासाठी जोर लावल्याने त्या आत्मलिंगाला पीळ बसला व ते गोकर्ण म्हणजे गाईच्या कानाच्या आकारासारखे झाले. मात्र ते जमिनीबाहेर आले नाही. तेव्हापासून ते शिवलिंग गोकर्ण महाबळेश्वर या नावाने प्रसिद्ध झाले. स्वतः भगवान सदाशिव, भगवान विष्णू, ब्रह्मदेव, कार्तिकेय, श्रीगणेश व सर्व देवादिकांनी या ठिकाणी वास्तव्य केले, असे गुरुचरित्रात सांगण्यात आले आहे.

गोकर्णक्षेत्रात असलेले भगवान शंकर त्यांचे केवळ स्मरण करताच सर्व पातकांचा नाश होतो. सूर्याशिवाय अंधाराचा नाश होत नाही त्याप्रमाणे गोकर्णक्षेत्री गेल्याशिवाय संपूर्ण पापनिष्कृती होत नाही. हजारो ब्रह्महत्या केलेला मनुष्यही गोकर्णक्षेत्री जाताच पापमुक्त होतो. या क्षेत्राचे माहात्म्य इतके थोर आहे, की कार्यसिद्धीसाठी ब्रह्मदेव आणि विष्णू यांनी येथे तप केले. जो कोणी गोकर्णक्षेत्री जाऊन भगवान शिव यांची पूजा करतो तो ब्रह्मपदाला जातो (संदर्भ- गुरुचरित्र अध्याय ७ वा व स्कंधपुराण.) या गोकर्णक्षेत्रात कोटी-कोटी शिवलिंगे आहेत. सत्ययुगात शिवलिंग श्वेत पाषाणाचे होते. त्रेतायुगात ते तांबूस वर्णाचे होते, द्वापारयुगात ते पीतवर्ण आणि कलियुगात ते कृष्णवर्णाचे होते. गोकर्ण महाबळेश्वराचा अधोभाग खूप गोल आहे. तो सप्तपाताळापर्यंत गेलेला आहे. परमपवित्र असे हे गोकर्णक्षेत्र पश्चिम समुद्राच्या काठावर आहे. तेथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते तसेच रविवारी, सोमवारी व बुधवारी जेव्हा अमावास्या येते तेव्हा गोकर्ण क्षेत्री केलेले समुद्रस्नान, शिवपूजन, पितृतर्पण, अन्नदान, होमहवन अनंत फळ देणारे आहे. या ठिकाणी श्रीगणेशजींचेही मंदिर आहे तसेच गोकर्णापासून ३० कि. मी. अंतरावर मुरुडेश्वर हे अत्यंत प्रेक्षणीय स्थळ आहे. हे गोकर्णक्षेत्र पुण्यवान स्थान आहे, म्हणूनच श्रीपाद श्रीवल्लभ या पवित्र क्षेत्री ३ वर्षे वास्तव्यास होते.

**निवास**

या ठिकाणी भक्तांना निवासाकरिता शुल्करहित मंदिरातील ब्राह्मणांची घरे आहेत व तसेच लॉजसुद्धा उपलब्ध आहेत.

**महाप्रसाद**

या ठिकाणी दिवसातून दोन वेळा महाप्रसाद मिळतो. दुपारी १२ ते २ व रात्री ७.३० ते ८.३०.

**गोकर्ण महाबळेश्वरला कसे जाल? एसटी बसद्वारे...**

कर्नाटकमध्ये हे ठिकाण आहे. नांदेडवरून गाडीने जाणार असाल तर एकूण ७०० कि. मी. प्रवास होतो व १४ ते १५ तास लागतात. मार्ग- नांदेड - लातूर - सोलापूर - हुबळी - येल्लापूर - अंकोला - गोकर्ण महाबळेश्वर.

**रेल्वेने...**

रेल्वेने प्रवास असेल, तर नांदेडवरून सकाळी ८.३० वाजता देवगिरी एक्सप्रेसने सिकंदराबादला जावे. लगेच दुपारी ४ वाजता हुबळी एक्स्प्रेसने हुबळी स्टेशनवर सकाळी ६.०० वाजता उतरावे व तेथून एसटी बसने अंकोला व गोकर्ण महाबळेश्वरला उतरावे. (हुबळी ते गोकर्ण एकूण ५ तास लागतात). तसेच मुंबई, पुणे येथून आठवड्यातून एकदा गोकर्ण महाबळेश्वरला जाण्याकरिता रेल्वे आहे.

### गोकर्ण महाबळेश्वर निर्मितीची कथा

त्रेतायुगात राक्षसांचा राजा 'रावण' हा लंकेवर राज्य करीत होता. लंकाधीश रावण हा अत्यंत दुष्ट व महापराक्रमी राजा असला, तरीदेखील शिवभक्त म्हणून ओळखला जाई. रावणाची माता कैकसी हीदेखील शिवभक्त होती. कैकसी रोज समुद्रकिनारी जाऊन मातीचे शिवलिंग तयार करी, त्याची प्राणप्रतिष्ठा करून पूजा व अभिषेक करत असे. मात्र समुद्राच्या प्रवाहात हे मातीचे शिवलिंग वाहून जाई. तरीदेखील कैकसीचा नित्यनेम चुकत नसे. हे पाहून एकदा रावण कैकसीस म्हणाला, "माते तू रोज मातीचे शिवलिंग तयार करून त्याची पूजा का करतेस? मी तुला प्रत्यक्ष भगवान शंकरांचे आत्मलिंग आणून देतो. आत्मलिंग म्हणजे भगवान शंकर यांच्या आत्म्यातून निघालेले शिवलिंग, ज्याची पूजा केल्याने प्रत्यक्ष भगवान शंकर यांची पूजा केल्याचे फळ मिळते." रावण जसा शिवभक्त होता तसाच तो मातृभक्तही होता. आपल्या मातेस भगवान महादेवांचे आत्मलिंग आणून देण्यासाठी त्याने कैलासावर जाऊन भगवान शंकर यांची कठोर तपश्चर्या केली. रावणाच्या तपश्चर्येवर महादेव प्रसन्न झाले व म्हणाले, "लंकाधीश, मी तुझ्या तपश्चर्येने प्रसन्न झालो आहे. तुला हवा तो वर माग." मातृभक्त रावणाने भगवान शंकर यांच्याकडे आपल्या मातेसाठी भगवान शंकर यांच्या आत्मलिंगाची मागणी केली. भगवान शंकर यांनी आपल्या आत्म्यातून शिवलिंगाची निर्मिती करून ते रावणाच्या हाती दिले व म्हणाले, "लंकाधिपती, हे माझे आत्मलिंग आहे. हे तुझ्या लंकापुरीत घेऊन जा, तेथे याची स्थापना कर. मात्र एक गोष्ट लक्षात ठेव, लंकेत जाईपर्यंत हे आत्मलिंग खाली जमिनीवर ठेवू नकोस. हे जेथे ठेवले जाईल तेथेच ते स्थापन होईल." भगवान शंकर यांची आज्ञा घेऊन रावण आत्मलिंग घेऊन लंकेस निघाला. भगवान शंकर यांनी महापराक्रमी पण दुष्ट रावणास आत्मलिंग दिल्याचे समजताच सर्व देवदेवता चिंतेत पडले. साक्षात भगवान महादेव यांचे आत्मलिंग पूजेस लाभल्याने दुष्ट रावण अधिक बलशाली व दिग्वीजयी होईल. त्याचा उन्मतपणा आणखी वाढेल व देवगणांना याचा त्रास होईल या विचारांनी सर्व चिंताग्रस्त देवदेवतांनी श्रीनारदमुनींसह विघ्नहर्त्या श्रीगणेशजींकडे धाव घेतली. श्रीगणेशजी आपली विवंचना सांगून रावण आत्मलिंग घेऊन लंकेस पोहोचता कामा नये, अशी विनंती केली. श्रीगणेशजींनी देवांची विनंती मान्य करून त्यांना निश्चिंत होण्यास सांगितले.

श्रीगणेशजी एका ब्राह्मण बालकाचे रूप धारण करून रावणाकडे निघाले. रावण समुद्रकिनाऱ्याजवळ येताना दिसताच श्रीहरी विष्णू यांनी आपल्या सुदर्शनचक्राने सूर्यास झाकून टाकले. सूर्यास्त झाला असे समजून रावण चिंतेत पडला. रावण एक अतिशय विद्वान पंडित होता. त्याला चार वेद आणि सहा उपनिषदे यांचे सखोल व संपूर्ण ज्ञान होते. तो दररोज नित्यनेमाने संध्या करायचा. आपल्या रोजच्या संध्येची वेळ झाली. भगवान शंकर यांच्या आज्ञेनुसार आत्मलिंग खाली ठेवायचे नाही. मग आता संध्या कशी करायची? असा विचार करीत असतानाच रावणाचे लक्ष जवळच गुरे राखीत असणाऱ्या बालकाकडे गेले. रावणाने बालगुराख्यारूपी श्रीगणेशजींकडे मदत मागितली. रावण श्रीगणेशजींना म्हणाला, "मुला, माझी संध्येची वेळ झाली आहे. मला एक मदत कर. मी समुद्रात जाऊन संध्या करून येईपर्यंत तू हे आत्मलिंग सांभाळ, मी लगेचच येतो. पण मी येईपर्यंत हे हातातून खाली ठेवू नकोस." बालगुराखीरूपी श्रीगणेशजी यांनी रावणाची विनंती मान्य केली व त्यास सांगितले, "महाराज, मी आपणास मदत करण्यास तयार आहे. परंतु हे शिवलिंग खूप जड असून ते जास्त वेळ हातात धरून राहणे मला शक्य होणार नाही. मी आपणास तीनदा हाक मारेन तेव्हा तुम्ही या व हे शिवलिंग आपल्या ताब्यात घ्या अन्यथा मी हे खाली ठेवीन" बालगुराखीरुपी गणेशाचे म्हणने मान्य करून रावण संध्येस निघून जातो. रावणाने संध्या सुरू करताच श्रीगणेशजी आपल्या लीलेस सुरूवात करतात. ते घाईघाईने रावणास तीनदा हाक मारतात व हातातील आत्मलिंग जमिनीवर ठेवू लागतात. ते जमिनीवर ठेवू नकोस अशा इशारा रावण लांबून करूनही तिकडे लक्ष न देता श्रीगणेशजी आपल्या हातातील आत्मलिंग जमीनीवर ठेवतात. श्रीगणेशजींनी देवतांना दिलेले आश्वासन पूर्ण केल्याने सर्व देवदेवता आनंदाने श्रीगणेशजींवर फुलांची वृष्टी करतात. हे पाहून रावणास कळून चुकते, की हे काम देवदेवतांचेच आहे. क्रोधीत रावण आत्मलिंग उचलण्याचा खूप प्रयत्न करतो. परंतु आत्मलिंग तसूभरही हलत नाही. मग आत्मलिंग उचलत नाही म्हणून रावण सर्वशक्तीनिशी आत्मलिंग जोरजोरात हलवितो आणि त्यामुळे आत्मलिंगाचा आकार गाईच्या कानासारखा होतो. अनेक प्रयत्नांनंतरही आत्मलिंग जागचे न हलल्याने शेवटी रावण निराश होऊन लंकेस परततो. गाईच्या कानासारखे म्हणून गोकर्ण तर महाबलशाली रावणाने अनेक प्रयत्न करूनही आत्मलिंग हलले नाही म्हणून महाबळेश्वर (महा+बळ+ईश्वर)... अशा प्रकारे महादेवांच्या या आत्मलिंगास 'गोकर्ण महाबळेश्वर' असे नाव पडले. कर्नाटकच्या कुमठा तालुक्यातील हे ठिकाण 'गोकर्ण महाबळेश्वर' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. हे ठिकाण मोक्षाचे द्वार समजले जाते. त्यामुळे या ठिकाणास दक्षिण काशी असेदेखील संबोधले जाते. आत्मलिंगाची स्थापना झालेली पाहून रावणाने संतापून आत्मलिंगासोबत आणलेली सर्व सामग्री इतरत्र फेकून दिली (उदा.- आत्मलिंग आणलेला डबा, डब्याचे झाकण, आत्मलिंगावर टाकलेले कापड, धागा इत्यादी.) या चारही वस्तू वेगवेगळया ठिकाणी जाऊन पडल्या. गोकर्ण महाबळेश्वरबरोबरच या चारही ठिकाणांस धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. भगवान शंकर व पार्वती यांनी खालीप्रमाणे या ठिकाणास पंचक्षेत्र असे नाव दिले.

१) गोकर्ण महाबळेश्वर- महादेवांचे मुख्य आत्मलिंग
२) सज्जेश्वर- आत्मलिंग आणलेला डबा पडला ते ठिकाण (३५ कि. मी. अंतरावर)
३) धारेश्वर- आत्मलिंगास बांधून ठेवलेला धागा पडला ते ठिकाण (४५ कि.मी. अंतरावर)
४) गुनावंतेश्वर- जेथे आत्मलिंगाचे झाकण पडले ते ठिकाण (६० कि. मी. अंतरावर)
५) मुरुडेश्वर- आत्मलिंगास झाकलेले कापड ज्या ठिकाण पडले ते ठिकाण (७० कि. मी. अंतरावर)

अशा प्रकारे भगवान शंकर यांच्या आत्मलिंगाच्या श्रीगणेशजींमुळे 'गोकर्ण महाबळेश्वर' या ठिकाणी स्थापना झाली.

# सूर्याचे ७ शक्तिशाली मंत्र

ग्रहांचा राजा मानला जाणारा सूर्य हा हिंदू धर्मातील पाच देवांपैकी एक मानला जातो. ते जीवनातील आदर आणि यशाचे घटक देखील मानले गेले आहेत.

आठवड्यातील प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवाला समर्पित असतो. तसेच रविवारी सूर्यदेवाची पूजा केली जाते. असे मानले जाते, की रविवारी सूर्यदेवाला समर्पित काही विशेष मंत्रांचा जप केल्यास व्यक्तीच्या जीवनातील सर्व मनोकामना पूर्ण होतात. आज तुम्हाला अशाच काही मंत्रांबद्दल सांगणार आहोत.

या ७ शक्तिशाली मंत्रांपैकी ज्याचा उच्चार तुम्ही अचूकपणे करू शकता, बरोबर लक्षात ठेवू शकता, त्यापैकी एकाचा रविवारी जप करावा. सूर्यदेव तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण करतील.

### सूर्यदेव मंत्र

**ॐ घृणिं सूर्य्यः आदित्यः**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय सहस्रकिरणराय मनोवांछित फलम् देहि देहि स्वाहा.**
**ॐ ऐहि सूर्य सहस्त्रांशों तेजो राशे जगत्पते, अनुकंपयेमां भया, गृहाणार्घ्य दिवाकरः**
**ॐ ह्रीं घृणिः सूर्य आदित्यः क्लीं ॐ**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय नमः**
**ॐ सूर्याय नमः**
**ॐ घृणि सूर्याय नमः**

धार्मिक शास्त्रांमध्ये सूर्याला प्रभावशाली ग्रह मानले गेले आहे. म्हणूनच सूर्याला ग्रहांचा राजा असेही म्हणतात. सूर्य हा ऊर्जा आणि आत्मा यांचा कारक आहे. असे म्हटले जाते की जर कुंडलीत सूर्य मजबूत स्थितीत असेल आणि शुभ ग्रहांच्या प्रभावाखाली असेल तर अशी व्यक्ती राजासारखी असते. सूर्याभिमुख व्यक्ती जीवनात उच्च स्थान प्राप्त करून मान-सन्मान प्राप्त करतो असे म्हणतात.

**रविवारी करा हा उपाय (रविवार उपाय)**

- रविवारी भगव्या रंगाचे कपडे घालावेत.
- शक्य असल्यास रविवारी उपवास ठेवा आणि सूर्यदेवाची पूजा करा.
- सूर्यदेवाची कृपा होण्यासाठी रविवारी गूळ, लाल फुले, तांबे, गहू इत्यादींचे दान करावे.
- माणिक रत्नाने सूर्य मजबूत होतो.
- त्यामुळे कुंडलीत कमकुवत रवी असलेल्या लोकांनी रुबी धारण करावे.
- रविवारी बेल मूळ धारण करून एक मुखी रुद्राक्ष धारण करावा. यामुळे जीवनात आनंद आणि लाभ मिळतात.

